# कोरोनाचे आंतरराष्ट्रीय राजकारणावरील झालेल्या परिणामांचे अध्ययन

**भूपेंद्र किशोर बाणाईत**

संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्रविभाग

सामाजिक शास्त्रे प्रशाळा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव.

**प्रस्तावना:** जगाने सन १९१४ ते १९१८ व १९३९.४५ या काळात पहिले व दुसरे जागतिक महायुद्ध पाहिलेहे महायुद्ध दोन परस्पर वैचारिक विरोधी राष्ट्रांमध्येहे महायुद्ध झाले.परंतुया महायुद्धाचा परिणाम हा संपूर्ण जगावर झाला पहिल्या महायुद्धात तब्बल ८० लाख सैनिक मरण पावले तसेच ७५००० प्रशियन नागरिकांचा मृत्यू झाला. एवढेच नव्हे तर दुसऱ्या महायुद्धाने पहिल्या महायुद्धात पेक्षा अधिक उग्र रूप धारण केले दुसरे महायुद्ध सन १९३९ ते १९४५ या काळात घडले  या महायुद्धात 6 कोटी २० लाख लोक मृत्युमुखी पडले हा एवढा मोठा यासाठी आहे की ही लोकसंख्या जगाच्या त्यावेळच्या लोकसंख्येच्या २.५ टक्के इतकी होतीतरीसुद्धा प्रत्येक राष्ट्राचे वेगवेगळे अंदाज आहेत .कारण दुसर्या  जागतिक महायुद्धात जगातील साधारणपणे सर्वच राष्ट्रांचा सहभाग होता याचा फटका जगातील सर्वच राष्ट्रांना बसला होता या दोन्ही जागतिक महायुद्ध यांच्या परिणामांचा सखोल विचार केल्यानंतर १९४५ ला आंतरराष्ट्रीय शांतता, सार्वजनिक आरोग्य ,मानवाधिकार, सामाजिक प्रगती, आर्थिक विकास, असे उद्दिष्ट घेऊन संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली .व अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले हितसंबंध प्रस्थापित व्हावे सहकार्य व शांततेच्या मार्गाने प्रत्येक प्रश्न सोडवावा तसेच प्रत्येक राष्ट्राचा आर्थिक विकास व्हावा व प्रत्येकराष्ट्रातील लोकांचा जीवनस्तर व त्यांना चांगले आरोग्य मिळावे त्यांचा मिळावे व त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचवावा तसेच जीविताची हमी मिळावी ई. बाबी लक्षात घेऊन सर्व राष्ट्रांनी आपापल्या परीने आपापल्या प्रादेशिक क्षेत्रात विविध प्रादेशिक संघटनांची स्थापना केली त्यात मुख्यत्वे सार्क,आशियान, युरोपियन युनियन ,ओपेक अशा संघटना स्थापन केल्या गेल्यापुढील कालखंडात मानवाने विज्ञानाच्या साह्यानेविविध प्रयोग करून नवीन नवीन शोध लावले व प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या नैसर्गिक बाबतीत त्याने आपला हस्तक्षेप केला व त्याचाच परिपाक म्हणून विविध आजारांचा व रोगांचा सामना संपूर्ण जगात करावा लागत आहे. जग आजवर विविध आजारांना सामोरे गेले त्यात पोलिओ,क्षयरोग, प्लेग, कॉलरा या आजारांनी कमी–जास्त प्रमाणात जगातील सर्वच राष्ट्रांना प्रभावित केले व सध्या काळात जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेला आजार कोरोनाया आजाराने संपूर्ण जग सद्य काळात भयभीत झालेले आहे आणि म्हणूनच कोरोनाआणि आंतरराष्ट्रीय राजकारण व संघटनांचे बदलते स्वरूप याबद्दलची माहिती सदर संशोधन लेखातून सादर करण्यात आली आहे.

**महत्व:**

१)कोरोनाया आजाराबाबत आंतरराष्ट्रीय संघटना कशाप्रकारे उपाय योजना करीत आहेत हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल.

२)कोरोनाया आजारामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकारणाचे स्वरूप कशाप्रकारे बदलत आहे याचे अध्ययन करणे महत्त्वाचे आहे.

३)आंतरराष्ट्रीय संघटना व त्यात सहभागी असलेले देश त्यांच्या संबंधांवर कोरोना या आजाराचा परिणाम कशा प्रकारे होत आहे याबाबत जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

**उद्दिष्टे:**

१)कोरोना या आजारा बद्दल जाणून घेणे.

२) कोरोना या आजाराचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर कशाप्रकारे प्रभाव पडत आहे हे जाणून घेणे.

३)कोरोना या जागतिक आजाराबाबत आंतरराष्ट्रीय संघटना व प्रादेशिक संघटना आपल्या क्षेत्राबाबत कशा प्रकारचे पावले उचलत आहेत हे जाणून घेणे.

**अध्ययनपद्धती**:

प्रस्तुत शोधनिबंध देण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलाअसून शोधनिबंध साठी दुय्यमतथ्यांचा वापर केला गेला आहेकोरोनाचे आंतरराष्ट्रीय परिणाम या

विषयासंदर्भातील विविध वृत्तपत्रे तसेच ऑनलाइन आर्टिकल पुस्तकेइत्यादी माध्यमांचा आधार घेऊन दुय्यम तथ्य प्राप्त करण्यात आली आहे.

**कोरोना म्हणजे काय:**चीनमधीलवूहानया कोरोनाविषाणूच्या केंद्रस्थान असलेल्या शहरातून पसरलेल्या रोगामुळे जगभरामध्ये मृत्यू झालेल्यांची संख्या पाच हजाराहून अधिक झाली मात्र अचानक या विषयांचा उल्लेख नोवेल कोरोनावरूनकोविड–१९ करण्यात येऊ लागला आहे . कारण म्हणजे जागतिक आरोग्य संघटना म्हणजेच डब्ल्यू, एच, ओ या आजाराचे नामकरण केले आहे कोरोना हा आजार असल्याचे डब्ल्यू, एच, ओ ने घोषित केला आहे .हा आजार विषाणूंमुळे होतो त्या विषाणूकोवि नाव देण्यात आले आहे एखादा रोग पसरविणाऱ्या विषाणू ची उत्पत्ती कुठे ,कधी, आणि कशी ,झाली यावरूनडब्ल्यू, एच, ओ मार्फत या विषयाला नाव दिले जाते .याच पार्श्वभूमीवर कोविड–१९ नाव देण्यात आला आहे.कोविड–घश्मधील हा शब्द तीन शब्दांची अध्याक्षरे घेऊन तयार करण्यात आला आहे यामध्ये सीओम्हणजे कोरोना,वीआयम्हणजे. व्हायरस आणि डीम्हणजे डिसीसया तीन शब्दतयार करून कोविड–१९ नाव देण्यात आलं आणि घश्‍ म्हणजे डब्ल्यू,एच,ओ नुसार या विषाणूंचा शोध कोणत्या साली लागला त्यावरून ते ठरविण्यात येतो. चीनमधील वुहान मध्ये नोव्हेंबर च्या शेवटच्या आठवड्यापासून या विषाणूमुळे आजारी पडणार याची नोंद सापडते त्यामुळे या विषाणू ला नाव देताना १९ हा आकडा देण्यात आला हा आजार जरी चीनच्या वुहान या शहरा पासून सुरू झाला असला तरी या आजाराने आंतरराष्ट्रीय सीमा पार करत संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात आणले आहे.

**आंतरराष्ट्रीयस्तरावर कोरोनामुळे झालेलेपरिणाम:**

१. आंतरराष्ट्रीय राजकारणातचीनचावाढताप्रभाव:एकीकडे संपूर्ण जगावरकोरोनाया विषाणूजन्य संसर्गाचा दुष्परिणाम झालेला दिसून येतो .जगभरात ७ लाखापेक्षा अधिक लोकसंख्यासंसर्ग त्रस्त झाले आहेत ४० हजार लोकांचा या विकाराने मृत्यू झाला आहे बचावात्मक उपाय म्हणून लोकडाऊन करून लोकांना सक्तीने स्वत:च्या घरात बसवले जात आहे जगभरातील बहुतांश देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडत आहेत. आणि दुसरीकडे वुहान मधून या विषाणूजन्य रोगाचा उगम झालातो चीन या प्रकोपापासून पूर्ण झाल्याचे चित्र दिसत आहे तेथील दैनंदिन व्यवहार सुरू झाले आहेत पर्यटन क्षेत्र खुले झाले आहे .उद्योगधंद्यांत पैकी जवळपास ८०टक्क उद्योग सुरू झाले आहेत रेल्वेसेवा विमानसेवा इत्यादी सर्व बाबी खुल्या करण्यात आले आहेत सर्वात महत्वाचे म्हणजे जगाला कोरोना ग्रस्त करणारा चीन आज औषध निर्मिती करून आणि त्यचा मोठ्या प्रमाणात निर्यात करून अब्जावधी डॉलरचा नफा कमवत आहेगेल्या दोन तीन महिन्यात करण्याच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर दिसले हे चित्र नक्कीच विरोधाभासी किंवा विसंगत आहे. याचे कारण चिननेजगालामहारोगाच्या संकटात लोटले असे मानणाऱ्यांची संख्या वाढत आहे.चीनमधून आलेल्या विषाणू पाहता–पाहता सर्व जगात पसार झाला आणि राज्यभरातील बहुतांश देश आपल्या सर्व प्राथमिकता बाजूला ठेवून केवळ कोरोना ची संघर्ष करताना दिसत आहे. पण याच वेडी मात्र चीन या आजाराचे भांडवल करून अब्जावधी डॉलरचा नफा कमावताना दिसत आहे वचिन आता आम्हाला जग सावरायचे आहे अशी उदारमतवादी भूमिका घेतस्वत: मिळवणे सुरु केले आहेप्रत्यक्षात चीन औषधांची आणि वैद्यकीय साधनांची निर्यात करून भरभक्कम नफा मिळत आहे खास करून ही मदत युरोप व अमेरिका या देशांना केली जात आहे.माग त्यांनसनीटायझरअतिदक्षता विभागातील महत्त्वाची साधने सुरक्षेसंबंधी तिकीट हे सर्व चीनमध्ये तयार होते व तेथूनच त्यांची निर्यात देखील होते त्यातून चीन एकीकडे आर्थिक नफा मिळत आहेतचआणि यात स्वत: जगावरील प्रभाव वाढण्याचा प्रयत्नदेखील करीत आहे वास्तविक पाहताकोरोनाविषाणूचा जन्म कसा झाला.याविषयी अनेक शंका व्यक्त केल्या जात आहे यामध्यचीन नेच या विषाणू तयार केला असावा असा आरोप किंवा याबाबत चर्चा मोठ्या प्रमाणात केली जात आहे कारण वुहान मध्येमर्यादित होता ३५०० लोक मरण पावले, आणि८०००लोकांना त्याचा संसर्ग झाला परंतु वुहान पासून ७०० किलोमीटर दूर च्या शांघाय सारख्या शहरांमध्ये केवळ सात–आठ रुग्णांचा मृत्यू झाला. शांघाय शहराची लोकसंख्या तीन कोटी आहे व्यापारी राजधानी असलेल्या या शहरात मुंबईपेक्षा लोकसंख्येची घनता अधिक आहे असे असूनही शांघाय मध्ये अत्यल्प लोकांचा मृत्यू कसा झाला एवढेच नव्हे तर एवढेच नाही तर हीच परिस्थिती बीजिंग या

शहराची देखीलआहे असे काही प्रश्न निर्माण होतात तसेच चीनच्या यापूर्वीचा इतिहास पाहता असे लक्षात येते की तेथील साम्यवादी एकाधिकारशाही राजवटी पुढे एखादी उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर त्यांच्या लेखी माणसाचे आयुष्य फार महत्त्वाचे नसते.१९८९ चीनमध्ये शांततामय मार्गाने सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलनात त्यांनी रणगाडे चालून चिरून टाकले होते.. सांगण्याचा मुद्दा एवढाच की चीनमध्ये लोकशाही कोणत्याही टोकाला जाऊ शकतात हा आत्मविश्वास ज्याला चीन मिडल किंगडंम म्हणतो त्यावर आधारलेला आहे म्हणजे आम्ही जगाला नेतृत्व दिले पाहिजे या महत्त्वाकांक्षेपोटी चीन सदैव तयारी करीत असतो परंतु अमेरिका असेपर्यंत ही महत्वकांक्षा पूर्णाहोऊ शकत नाही हे चीनला माहित आहेकारण चीनच्या तुलनेत अमेरिका हा प्रगत आहे चीनला अमेरिकेचा सामना समोरासमोर करना शक्य नाही .शिवाय अंतराळ सामरिक क्षेत्रात अमेरिकेचा मुकाबला करणे चीनला शक्य नाही त्यामुळे कटकारस्थान च्या माध्यमातून अमेरिकेचे सामर्थ्यकमी करण्याचा प्रयत्न करीत आहे असा दावा काही अभ्यासक करू लागले या अभ्यासकांनी काही साहित्याचे संदर्भ दिले आहे १९९३पासून चीन अमेरिकेची बरोबरी करण्यासाठी (बायोलॉजीकलस वेपन) विकसित तयार करीत असल्याचा दावा डॉफ्रान्सिस या सारख्या अमेरिकेच्या शास्त्रज्ञ व्यक्त करीत आहे. त्यामुळे अमेरिकेचे सामर्थ्य कमी करण्यासाठी चीनने हा विषाणू तयार केला असावा, असे मत व्यक्त केले जात आहे अशा प्रकारे चीन अत्यंत शिस्तशीर पद्धतीने संपूर्ण जगाच्या नाड्य आपल्या हाती ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे व अब्जावधी डॉलरचा नफा कमवत आहे अशा प्रकारचे स्वत:चा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणात वाढवण्याचा प्रयत्न चीन करीत आहे.

२. अमेरिकेची स्वत:चे स्थानटिकवण्यासाठी ची धडपड :जगभरातील राष्ट्रांच्या तुलनेत कोरोना चा सर्वाधिक संसर्ग अमेरिकेत झाल्याचे निदर्शनास येत आहे.इथल्या मृतांच्या आकडेवारीने चीन ला देखील मागे टाकले आहे एवढ्यत लॉक डाऊन आणि सोशलडिस्टन्स कठोरपणे अमलात आणले तरी १ लाख २.५ लाख नागरिकांची मृत्यू होण्याची शक्यता आहे. चीनच्या तुलनेत आता पर्यंत अमेरिकेत ६१८४९ लोक दगावले आणि १०६७३८२ लोक बाधित आहेत सर्वाधिक वाईट स्थितीवॉशिंग्टन व न्यूयॉर्क या शहराची आहे.या शहरात रुग्णालय आणि शवगृहा क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाली आहे आणिबाणीच्या स्थितीतील फोटोवरुन कोरोना दबावामुळे अमेरिकेतील वैद्यकीय प्रणाली कशी उध्वस्त झाली ते ९/११ च्या हल्ल्यात त्याकाळातील भीती आणि त्यापेक्षाही आणि विशाणू मुळे उद्‌भवलेली आहे उदाने मोठे सभागृह मोठे हॉटेल्सचे रूपांतर रुग्णालयामध्ये करण्यात आले आहे मृतांच्या ढि गाऱ्या साठी नवशव गृह बनवण्यात येत आहे आवश्यक वैद्यकीय सामग्रीची टंचाई इतकी तीव्र झाली आहे की प्रतिष्ठेच्या हॉस्पिटलमध्ये परिचालकांना सुरक्षेसाठी कचऱ्यातील पिशव्या उपयोगात आणावे लागत आहेनर्स आणि डॉक्टर्स देखील या रोगाचे बळी ठरत आहे स्वत: राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी ३१ मार्चपर्यंत दोन लाख ४० हजार लोक मृत्युमुखी पडतील अशी भीती व्यक्त केली होती अनेक दिवस राष्ट्रदक्षयांनी विषयांकडे दुर्लक्ष केले त्यामुळे अमेरिकन नागरिक पुरते धास्तावले आहेत अमेरिकेत इतक्या चांगल्या आरोग्य सुविधा आहेत त्याच्या बळावरकोरोनारोखणे शक्य झाले असते परंतु असे प्रयत्नच झाले नाहीत त्यामुळे लोक संतापले आहेत मात्र अमेरिकेतील व्यवस्था या प्रक्रियेस बाधक ठरली आहे जोपर्यंत राष्ट्राध्यक्ष मध्यवर्ती निधी गोळा करत नाही, विदेशी दौऱ्यावर निर्बंध लागत नाही, बाहेरून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी तसेच रुग्णा विषयी उपाय योजना तरी बाबत घोषणा करत नाही तोपर्यंत काहीही कारवाई यंत्रणेला करता येणार नाही यांच्या ढिसाळपणा मुळे कोरोनावाढला हेच मोठे कारण आहे २० जानेवारीला धोरणाचा पहिला रुग्ण आढळला नंतर १० मार्च रोजी १३०० पेक्षा जास्त संख्या यांची होती असे असतानाही यांनी जास्त लक्ष दिले नाही कोरोना अमेरिकेसाठी मोठे आव्हान किंवा धोका नाही असे वक्तव्यट्रम्प यांचे होते अमेरिकेच्या सुदृढ आर्थिक स्थितीच्या मुद्द्यावर निवडणूक घडत होते बहुदा या विषाणूमुळे अर्थव्यवस्था डबघाईस येईल या भीतीपोटी त्यांनी तात्काळ पावले उचलली नसावेत कारण त्यांनी जर संपूर्ण देशात म्हणजेच अमेरिकेत लोक डाउन किंवा शटडाऊन ही प्रक्रिया राबवली असती तर त्याचा फटका हा त्यांच्या अर्थव्यवस्थेवर झाला असता व त्याचा फटका अमेरिकेचे अर्थव्यवस्था बसला असता व त्यामुळेच अमेरिकेच्या सर्वोच्च पदाला याबाबतच हादरा बसला असता आणि म्हणून कदाचित

त्यांनी वेळेत पावले उचलली नाहीतआजही अमेरिकेत शटडाऊन झालेले नाही शिवाय पुढील काळात राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका होणार आहेतव डोनाल्ड ट्रम्पयांच्या निष्क्रियतेचा फटकात्यांना पुढील निवडणुकीत बसू शकतोव ट्रम्प यांनी याबाबत संपूर्ण दोष हा चिनला दिला परंतु आता ट्रम्प यांनी चीन संदर्भातील भूमिका बदलत चीन कडून मदत घेणे हे अमेरिकेला भाग पडले आहे या सर्वांचा गांभीर्याने विचार करतात यांच्या गैरव्यवस्थापन दुर्लक्ष दिसते पण बेजबाबदार इत्यादी बाबी कारणीभूत आहेत याचा उघड झाली आहे सर्व बाबींचा अभ्यास करता असे लक्षात येते की स्वत:ची अर्थव्यवस्था टिकवण्यासाठी लोक मरण पावले तरी चालेल परंतु संपूर्ण श्रद्धा जाऊन अमेरिका करणार नाही कारण यामुळे त्यांचे सर्वोच्च असलेले पद धोक्यात येऊ शकते

आत्मकेंद्री जग:संपूर्ण जगात कोरोनाआजाराने थैमान घातले आहे या आजाराचे बळी ५६६२९ तर संसर्ग ग्रस्त १०६४११८ इतकी संख्या झाली आहे म्हणजे जगातील अमेरिका, स्पेन, इटली ,चीन ,जर्मनी ,ब्रिटन ,इराण अशा मोठ्या अर्थव्यवस्था असलेल्या देशांना या आजाराचा सामना करावा लागत आहे तरी काही देशांनी स्वत:च्या देशातील लोकांचे जीवनाच्या सुरक्षेसाठी त्यांनी स्वत:च्या सीमा बंद केले आहेत की जेणेकरून बाहेरून कोणत्याही प्रकारचा धोका स्वदेशात येणार नाही व कोरोनाचा प्रसार जास्त होणार नाही या आजाराचा सामना जगातील महासत्ता असलेल्या अमेरिकेला सुद्धा करावा लागत आहे अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तर अमेरिका फर्स्ट हा नारा च दिला आहेयाद्वारे अमेरिकेतील जे लोक परदेशात अडकले आहेत त्यांना देखील अमेरिकेत येण्यापासून वंचित ठेवले आहे अशा प्रसंगी आंतरराष्ट्रीय राजकारणात कमालीची असुरक्षितता वाढली आहे त्यातून जगभरातील राष्ट्रांचा आत्मकेंद्री पणावाटत चाललाय जगातील प्रत्येक राष्ट्र हे स्वत:च्या लोकांचे प्राण वाचलेजावे यासाठी प्राधान्य देत आहे व याच कारणांमुळे राष्ट्रांमध्ये होणारे विविध करारमदार सद्यस्थितीत थांबवून ठेवलेले आहेत असेच चित्र आहे कारणकोरोनाहा आजार संसर्ग ग्रस्त आहेम्हणजे हा आजार मानवी संपर्कातून मोठ्या प्रमाणावर वाढत जातो व या कारणामुळे प्रत्येक देशाने आपल्या देशाच्या सीमा या बाहेरील नागरिकांसाठी बंद केल्या आहेतव प्रत्येक देश सद्यस्थितीत स्व देशातील नागरिकांना वाचवण्यासाठीभर देत आहे

आंतरराष्ट्रीय संघटनांचे बदलते स्वरूप :आज सद्यस्थितीत कोरोनाया महाराने जगभरातील १५ लाख लोकांना विळखा घातला आहे जो तो देश आपल्या सीमा सुरक्षित करण्यासाठी प्रयत्नशील आहे अशा बिकट परिस्थितीत अमेरिका जी संपूर्ण जगाचे महासत्ता म्हणून ओळखले जाते अशा अमेरिकेत नेही अमेरिका फर्स्ट हा नारा दिला आहे तसेच त्यांनी युरोपातील येणाऱ्या विमानांना ही बंदी घातली आहे ट्रम्प यांनी जर्मनीतील एका कंपनीसोबत करार करून कोरोनावरऔषध विकसित करण्याचा करार केला आहे पण हे औषध केवळ अमेरिकेपुरताच वापरण्यात येईल इतर राष्ट्रांना लागू पडणार नाही अशा सूचनाट्रम्प यांनी दिल्या आहेत यावरून अमेरिका किती स्वार्थी धोरण राबवीत आहे हे स्पष्ट होते याउलट भारताने इतर देशांना मदतीचा हात देऊ केला आहे चीनचच्या वुहान प्रांतात प्रादुर्भाव वाढला तेव्हा भारताने १५ टन औषधे व इतर साधन सामग्री चीनला पुरवली परंतु भारताने जेव्हा व्हेंटिलेटर त्याची मागणी केली तेव्हा चिनने उत्पादनात अडचणी असल्याची सबब पुढे केलीदुसरी बाब म्हणजे भारत या प्रादेशिक संघटनेने सर्वोच्च स्थानी आहे अशा सार्क संघटनेतील सदस्य राष्ट्रांना भारताने मदत देऊ केली आहे भारताने मालदीव आणि नेपाळ या देशांमध्ये मदतीसाठी डॉक्टर्स पाठवले आहेत मलेशिया इंडोनेशिया, व्हिएतनाम यासारख्या दक्षिण—पूर्व आशियाई देशांना कोरोनासंसर्गाचे परीक्षण परीक्षन पुण्यातील व्यरलोलॉजी इन्स्टिट्यूटने विकसित करून दिली आहे तसेच अफगाणिस्तान भूतान, बांगलादेश ,आणि श्रीलंका या चार देशांना कोविड—१९ सामना करण्यासाठी भारताने औषध व इतर साधन सामग्री व आर्थिक मदतही देऊ केली आहे इस्राईल ,इटली यांनी भारताला मदतीसाठी विनंती केली आहे आजच्या घडीला आशिय,एशियन रिजनल फोरम तसेच जी—२०,नाटो, युरोपियन युनियन ,ओआयसी या सारख्या प्रादेशिक संघटना अस्तित्वात आहेत की नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे कारण या सर्व संघटनांचा अभ्यास केल्यास या सर्व प्रादेशिक संघटना ज्या वेळेस स्थापन केल्या गेल्या त्या वेळेस आंतरराष्ट्रीय प्रश्न सामंजस्याने एकमेकांच्या मदतीने सोडवले जावे तसेच संकट समयी प्रादेशिक क्षेत्रातील देश हे एकमेकांसाठी मदतीसाठी तत्पर राहतील या दृढ विश्वासाने या संघटनांची निर्मिती केली होती परंतु तसे आज घडतांना

दिसत नाही कारण प्रत्येक देशांनी स्वत:चे दार बंद करून घेतले आहेत सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे संयुक्त राष्ट्र संघटनेनेकोरोनाविरुद्धच्या लढ्यत पुढाकार घेणे आवश्यक होते परंतु नुकताच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेत या संकट संकटावर चर्चा करा असा प्रस्ताव आला तेव्हा त्याला रशिया व चीन यांनी विरोध केला त्यामुळे जगावर एवढे मोठ संकट येऊनही या संघटनेत साधी चर्चा देखील झाली नाही अशा प्रसंगी भारताने पहिल्यांदा यासंदर्भात आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवर संयुक्त कृती आराखडा तयार केला पाहिजे असा आग्रह धरला आहे यासाठी सार्क संघटनेच्या सदस्य देशांच्या प्रमुखांशी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संपर्क साधला यामध्ये सामूहिक फंड निर्माण करण्याचा प्रस्ताव ठेवत दहा दशलक्ष डॉलर एवढा मोठा फंड भारताने देऊ केला आहे यापाठोपाठ जीह्रञ अध्यक्षपद असलेला सौदी अरेबिया शी संपर्क साधूनकोरोनाविरुद्ध सर्वांनी प्रयत्न करावे अशी विनंती देखील केली आहे याचे कौतुक इंग्लंड व ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी उघडपणे केले आहे अशाप्रकारे कोरोनायामहाआजारामुळे संपूर्ण जग भयभीत झालेले आहे प्रत्येक राष्ट्र स्वत: कसे सुरक्षित राहता येईल याची काळजी व जे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटना स्थापन केल्या गेल्या होत्या त्याचा विसर पाडत स्वहित लक्षात घेताअसे दिसून येत आहे की आंतरराष्ट्रीय संघटनांचे स्वरूप सध्या कालीन बदलताना दिसत आहे

अशाप्रकारे कोरोनायामहाआजारामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण,सामाजिक जीवनमान,आर्थिक स्थितीकशा प्रकारे प्रभावित होत आहेहे स्पष्टकरता येईल

**निष्कर्ष**

१)जगातील महासत्ता असलेलेअमेरिका सारखे राष्ट्र हे सध्या स्थितीला जगाचा विचार न करता आत्मकेंद्री बनलेले आहे

२)कोरोनाया आजाराने ज्या देशात जन्म घेतला असा चीन हा लवकरात लवकर स्थिरस्थावर होऊन स्वत:चा व्यापार वाढीस लागावा यासाठी मोठ्य प्रमाणावर प्रयत्न करीत आहे व आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वत:चा प्रभाव वाढविण्यावर भर देत आहे

३)विविध प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या उद्देशातून निर्माण केल्या गेल्यात्या प्रत्येक आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटनेतील सदस्य राष्ट्रांना त्या उद्दिष्टांचा कुठेतरी विसर पडला आहे असे दिसून येत आहे

४)कोरोना चा शिकार भारतही आहे मात्र तरीदेखील चीन ,नेपाळ, मालदीव, बांगलादेश, श्रीलंका इत्यादी विविध देशांना मदत करण्यासाठी भारत पुढे येत आहेएवढेच नव्हे तर भारताने सार्क संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांना मिळून कृती आराखडा तयार करावा अशी विनंती देखील केली आहे

**संदर्भसूची**

१) **दैनिक दिव्य मराठी.आर्टिकल दि. ७/४/२०२०**
२) https://t.me/skdeolankar १/४/२०२०
३) https://t.me/t.me /skdeolankar१६/३/२०२०
४) https://t.me/skdeolankar ६/४/२०२०
५) HTTPS://maharashtra/7.com ५/४/२०२०
६) HTTPS://lokmat.news18.com**१४/४/२०२०**
७) https://w.w.w **loksatta.com १६/३/२०२०**